# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.२/२०२४** **दिनांक ११/०१/२०२४**
**स्थळ- साई निवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी ३.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा गुरुवार दि.११.०१.२०२४ रोजी दुपारी ३.०० वा. संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृह येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/३५४७/२०२४, दि.०८.०१.२०२४ अन्वये सर्व मा. सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा **गुरुवार दि.११.०१.२०२४ रोजी दुपारी ३.०० वा. संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृह** येथे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. तुकाराम हुलवळे,**
**प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१** दि.०३.०१.२०२४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

**निर्णय क्र.३२** दि.०३.०१.२०२४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.२** दि.२२.०१.२०२४ रोजी श्री राम जन्मभुमी येथे श्री राममुर्ती प्राणप्रतिष्ठा निमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे वतीने भव्य अशा कार्यक्रमांचे आयोजन करणेबाबत.

**निर्णय क्र.३३** प्रस्तावात नमुद इ-साठी प्रस्तावातील असलेल्या आठ लाखा ऐवजी दोन लाख करण्यात यावा . प्रस्ताव मंजूर.

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३** सन २०२४ मध्ये संस्थानमार्फत साजरे करण्यात येणा-या तीनही उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.३४** पुर्वीचे पुरवठा धारकाने सन २०२३ चे दराने सन २०२४ साठी उत्सवांच्या निमंत्रक पत्रिका पाकिटासह छपाई करण्यास तयारी दर्शविली आहे. त्यामुळे पुन्हा नव्याने अंदाजे रु.१७,३५,५००/- खर्च करणे संस्थानचे हिताचे नाही. म्हणून पुर्वीचे पुरवठा धारकास छपाईचे काम देण्यास मान्यता देण्यात आली.

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.४** विभागीय चौकशी अधिकारी यांचे नेमणूकीबाबत.

**निर्णय क्र.३५** तहकुब.

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.५** संस्थान कायम कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०२३-२४ वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा अदा करणेबाबत.

**निर्णय क्र.३६** प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.६** **अर्जित रजा साठविणे व रजेचे रोखीकरण करणेबाबत.**

**निर्णय क्र.३७** **सेवा नियम-२०१३ मध्ये सक्तीने सेवानिवृत्त / स्वेच्छा निवृत्त/ रुग्ण सेवानिवृत्त / राजीनामा अथवा नोकरी सोडणारे कर्मचारी यांच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेचे कमाल तीनशे दिवसांच्या रोखीकरणाबाबत तरतुद नसल्याने शासनाकडून सेवा नियम-२०१३ मध्ये दुरुस्ती होणे आवश्यक आहे. त्यामुळे दुरुस्तीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.७** **दि.३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या/होणा-या कर्मचा-यांना लगतच्या १ जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन सेवानिवृत्ती वेतन निश्चित करणेबाबत.**

**निर्णय क्र.३८** **प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.८** **संस्थान कायम व संस्थान कंत्राटी कर्मचा-यांना गणवेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.३९** **ई-निविदा प्रक्रियेने कापड खरेदी करुन अधिकारी व कर्मचारी यांना वर्षातून एकदा दोन ड्रेससाठी कापड व शिलाईचे पैसे राज्य शासनाच्या दरानुसार देण्यास मंजुरी देण्यात येत आहे. कपडयाचा पॅर्टन व रंग प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ठरवावा. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.९** **नविन अद्यायावत सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वीत करणेकामी तयार केलेल्या प्रकल्प अहवालाचे सादरीकरण व याकामी येणा-या एकत्रित खर्चास (रु.३५.४०कोटी+कर) मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४०** **कॅप्टन रविंद्र रेड्डी व एस. रामाकृष्णन यांनी केलेले सादरीकरण पाहिले. विषय सुरक्षा संबधी व तांत्रिक असल्याने जिल्हा पोलीस अधिक्षक, अहमदनगर, एन. आय. सी., सिनीयर टेक्नीकल डायरेक्टर आणि या कामाची माहिती असलेली व्यक्ती हेरॉल्ड डिकोस्टा व प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची उपसमिती नेमण्यात यावी व या समितीकडून लवकरात लवकर अहवाल घेऊन समितीपुढे सादर करावा.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.१०** मे. स्प्रिती प्रॉडक्ट प्रा. लि. अंबाला यांना माहे जानेवारी २०२४ ते मार्च २०२४ या कालावधीसाठी गाईचे शुद्ध तुप पुरविणेकामी पुरवठा आदेश देणेबाबत.

**निर्णय क्र.४१** प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

**विषय नं.११** संस्थानचे विविध विभागांसाठी संगणक प्रि-प्रिंटेड स्टेशनरी छपाईकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.

**निर्णय क्र.४२** प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही- खरेदी विभाग)

---

**विषय नं.१२** संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी पेपरकप खरेदीकामी GeM निविदा प्राप्त न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.

**निर्णय क्र.४३** प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही- खरेदी विभाग)

---

**विषय नं.१३** संस्थानचे आरोग्य विभागासाठी स्वच्छता साहित्य खरेदीकामी GeM निविदेत प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.

**निर्णय क्र.४४** प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही- खरेदी विभाग)

---

**विषय नं.१४** MSME अंतर्गत निविदा फी व बयाणा रक्कम भरण्यासाठी सुट प्राप्त करुन ई-निविदा भरण्याची बंद असलेली सवलत चालू करणेबाबत तसेच GeM निविदा प्रकियेमध्ये सुध्दा निविदाधारकांना MSME अंतर्गत EMD भरण्याची सुट देणेबाबत.

**निर्णय क्र.४५** सवलत चालू करण्याचा प्रस्ताव अमान्य.

(कार्यवाही- खरेदी विभाग)

---

**विषय नं.१५** मा. ना. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचेकडील एस.एल.पी.नं. २३६८३/२०२३ दि.०३/११.२०२३ रोजीचे आदेशाप्रमाणे पर्यायी जागा मिळणेबाबत श्रीमती फातिमाबी बक्षु शेख व इतर ४ रा. शिर्डी, ता राहाता यांचा दि. ३०/११/२०२३ रोजीचा अर्ज.

**निर्णय क्र.४६** चर्चेअभावी तहकुब. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.१६** संस्था साईभक्तांचे सेवेसाठी चालवत असलेल्या पादत्राणेगृह व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायास जागा वापरास पुढील ११ महिन्यांची मुदतवाढ मिळणेबाबत मा. चेअरमन श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑफ सोसायटी लि. शिर्डी यांचेकडील पत्र जा. न. श्री सासंएक्रेसो/२०१/२०२३ दि. १६.१२.२०२३.

**निर्णय क्र.४७** प्रस्ताव मंजूर.

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१७** सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामधील संस्थानकडील दैनंदिन वापराने जमा होणा-या निरुपयोगी भंगार/सादिल स्वरुपाच्या साहित्याची विक्री करणेकामी ई-निविदा मागविणेबाबत.

**निर्णय क्र.४८** प्रस्ताव मंजूर.

**(कार्यवाही-अभिलेख कक्ष)**

---

**विषय नं.१८** संस्थानमार्फत श्री रामनवमी उत्सव-२०२४ तसेच उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरिता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी अंदाजे रक्कम रु.४२,७४,०००/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास व याकामी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.४९** प्रस्ताव मंजूर.

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१९** नवीन श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारतीमध्ये साईभक्तांचे सुविधेकरीता अतिरिक्त व्यवस्था निर्माण करणेसाठी येणारे रक्कम रु.३९,९०,०००/-मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.५०** चर्चेअभावी तहकुब.

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.२०** मंदिर परिसरातील इमारतीचे स्लोपींग स्लॅबचे खराब झालेल्या डिझाईन पट्टया बदलणेबाबत.

**निर्णय क्र.५१** प्रस्ताव मंजूर. **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.२१** **संस्थान कर्मचारी यांचेकरिता साईनिवास व सुलभ शौचालयाचे मधील व पाठीमागील जागेत टु व्हीलर पार्कींग व्यवस्था करणे व पूर्व बाजुकडील हद्दीवरील कम्पाऊंड भिंतीचे बांधकाम करणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५२** **चर्चेअभावी तहकुब.** **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.२२** **श्री साईबाबा संस्थान मार्फत नव्याने लेजर शो (Light & Sound Show) प्रकल्प BOT (Build– Operate-Transfer) तत्वावर उभारणेसाठी सल्लागार Rhino Engineers Pvt.Ltd., Ahmadabad व श्री नितीन कुलकर्णी यांचे सादरीकरण पाहून सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.५३** **तहकुब.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.२३** **मौजे निघोज येथील साईपालखी निवारामधील संस्थानला देणगी मिळालेल्या इमारतीकरिता जनरेटर रुमचे बांधकाम करणे, कॉमपैक्ट सबस्टेशनकरिता फांऊंडेशन तयार करणे व केबल करिता नाली तयार करणे याकामासाठी येणा-या रक्कम रु. २८,६९,४६६/-मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५४** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.२४** **श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारतीकरीता आकर्षक नव्या तंत्रज्ञानाची विद्युत रोषणाई करणे, होलोग्राफीक इमेज, एलईडी प्रोजेक्शन व श्री साईबाबांचे जीवन चरीत्रावरील थीम तयार करणेसाठी सल्लागार Rhino Engineers Pvt., Ltd., Ahmadbad यांनी तयार केलेले सादरीकरण होणेबाबत.**

**निर्णय क्र.५५** **सल्लागार श्री.नायडू यांनी केलेले सादरीकरण पाहिले.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.२५** **संस्थानचे द्वारावती भक्तनिवास व साईबाबा भक्त निवासस्थान (५०० रुम) या इमारतींचे सांडपाणी शुद्धीकरण करून पुर्नवापर करणेसाठी अनुक्रमे 200 KLD व 300 KLD क्षमतेची संयत्रे (Sewage Treatment Plant) BARC यांनी विकसीत केलेल्या Hybrid Granular SBR Treatment (GST) या तंत्रज्ञानानुसार उभारणीकरीता येणारे एकुण रु.२०५.३२ लक्ष मात्रचे प्राथमिक ढोबळ अंदाजपत्रकीय**

**खर्चास मान्यता मिळणेस तसेच सदर प्रकल्पाचे उभारणीकरीता BARC यांचे परवानाधारक (Licensees) व्यक्ती/संस्था यांचेकडून Design Build Operate Transfer (DBOT) या तत्वावर ई-निविदा मागविणेकरिता मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५६ माहिती घेऊन चर्चा करणे.**

**(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.२६ संभाव्य पाणीटंचाई कालावधीत संस्थानमार्फत करावयाच्या उपाययोजनांना व त्याकरीता येणारे अपेक्षित अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५७ मा.जिल्हाधिकारी महोदय यांचे समवेत चर्चेसाठी बैठक आयोजित करण्यात यावी.**

**(कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.२७ संस्थानचे कनकुरी व पिंपळवाडी ग्रामपंचायत तसेच इतर बाहेरील संस्थाना करणेत येणा-या पाणी पुरवठयाचे दरामध्ये सुधारणा करणेबाबत.**

**निर्णय क्र.५८ प्रस्ताव नामंजूर.**

**(कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.२८ विद्युत विभागाकरीता दैनंदिन इलेक्ट्रीकल मेन्टेनन्स कामाकरीता लागणारे विद्युत संबधीत साहित्याची एकाच वेळेस खरेदी न करता आवश्यकतेनुसार विद्युत विभागाचे स्टोअरमधील उपलब्धता तपासून विद्युत संबधीत साहित्याचे वार्षिक दर निश्चित करुन संस्थानचे विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून सदरहू साहित्य निम्नतम दरधारक यांचेकडून खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.५९ प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग/ विधी विभाग)**

---

**विषय नं.२९ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/विभागाकरीता आवश्यक असणारे ३ नग Ventilator with 5 year Warranty+Next 5 Year CMC सह व २ नग Neonatal Ventilator with 5 year Warranty+ Next 5 Year CMC सह ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.१,१२,००,०००/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६० रक्कम रुपये एक कोटीचे अधिन राहून वाटाघाटी करुन Ventilator with 5 year Warranty+Next 5 Year CMC सहा नग खरेदी करणेस मान्यता देण्यात येत आहे. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)**

---

**विषय नं.३० श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०२३-२४ या वार्षिक खरेदीमधील फेर ई-निविदेत दर प्राप्त न झालेल्या Tablet, Injection, Syrup, Ointment, Drop करीता दर निश्चिती (Rate Contract) करणेकामीच्या दुस-यांदा राबविण्यात आलेल्या फेर ई-निविदेस अनुसरुन प्राप्त निम्नत्तम दरधारकास पुरवठा आदेश देणेस तसेच उर्वरीत औषंधाकरीता कोटेशन मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६१ निविदा प्राप्त न झालेल्या औषधांसाठी हाफकिन्स व औषध प्राधिकरण यांचेकडून दर मागवून पुढील कार्यवाही करावी.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३१ कोरोना विषाणू (JN1 व्हेरीयंट) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकामी साईभक्तांना Disp.Face Mask व Hand Sanitizer उपलब्ध करुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.६२ शासनाचा आदेश प्राप्त झाल्यास त्यानुसार कार्यवाही करावी. सावधगिरी म्हणून सात दिवसासाठी पुरेल एवढया साठयाची खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३२ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकीय अधिकारी यांची आवश्यक रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याचे कालावधीसाठी भरणेसाठी जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविणेबाबत.**

निर्णय क्र.६३ प्रस्ताव मंजुर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)

---

विषय नं.३३ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील तपासणी सहाय्यक (Clinical Assistants) या रिक्त पदांबाबत.

निर्णय क्र.६४ प्रस्ताव मंजूर. परंतु सदर कंन्स्लंटंट ज्यांना तपासणी सहायक प्राप्त होतील त्यांनी ओ.पी.डी. रुग्ण तपासणे बंधनकारक राहिल. तपासणी सहायक यांची त्याकामी केवळ मदत घेता येईल. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)

---

विषय नं.३४ श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरामध्ये भाडेतत्वावर औषध दुकान चालू करणेबाबत.

निर्णय क्र.६५ मासिक भाडे रक्कम रु.१७,३१,०००/- ठरविण्यात येऊन पाच वर्षासाठी करार करण्यात यावा व प्रत्येक वर्षासाठी मुळ भाडे रकमेच्या १० टक्के वाढ करण्यात यावी. सर्जिकल साहित्याचे खरेदीवर ६० टक्के सुट व औषधांचे खरेदीवर १५ टक्के सुट मिळण्याची अट टाकुण नवीन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो सध्याचे दुकानदार यांना मुदतवाढ देण्यात येत आहे.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.३५ श्री साईबाबा धर्मादाय हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुलै-२०२२ ते सप्टेंबर-२०२२ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.१,७५,३२,९२८/- नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.६६ नोंद घेतली.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.३६ श्री साईबाबा धर्मादाय हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये ऑक्टोंबर-२०२२ ते मार्च-२०२३ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३,१०,८५,१९६/- नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.६७ नोंद घेतली.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.३७** **श्री साईबाबा धर्मादाय हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये एप्रिल-२०२३ ते ऑगस्ट-२०२३ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.२,८०,५०,६७७/- नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६८** **नोंद घेतली.** **(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३८** **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील C.T.Scan मशिन्सचे सन 2024 ते 2029 या पाच वर्षाकरीता कॉम्प्रेहेन्सीव्ह सर्व्हीस कॉन्ट्रक्ट करणेबाबत.**

**निर्णय क्र.६९** **ठरावीक कंपनीची मक्तेदारी असल्यामुळे त्याच कंपनीला सर्व्हिस कॉन्ट्रक्ट देणे योग्य राहील. प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चर्चा वाटाघाटी कराव्यात. सी.ए. दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घ्यावी.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)**

---

**विषय नं.३९** **श्री साईबाबा हॉस्पीटलमधील जिवनदायी आरोग्य योजनेचे विशेष लेखापरिक्षण अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.७०** **तहकुब.** **(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४०** **अ) सन २०२४ करीता L1 दरधारक कार्यादेश स्विकारणेस तयार नसल्याने सुरक्षा अनामत रक्कम (EMD) जप्त करून काळया यादीत समाविष्ट करणेस,**
**ब) L1 दरधारकांस काळया यादीत समाविष्ट केल्याने, सन २०२४-२५ करीता उक्त्या मजुरी दराने लाडू व बर्फी प्रसाद तयार करून पॅकींग करून घेणेसाठी नव्याने ई निविदा प्रक्रीया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.७१** **प्रस्ताव मंजूर. नवीन ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो सध्याचे ठेकेदार यांना मुदतवाढ देण्यात येत आहे.**

**(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)**

---

**विषय नं.४१** **संस्थान प्रकाशीत श्री सद् गुरू साईनाथ सगुणोपासना आरतीचे विविध प्रादेशिक भाषेतील पुस्तके नविन दर्शन रांगेतील आरती प्रतिक्षा हॉलमध्ये साईभक्तांना उपलब्ध करून देणेबाबत.**

**निर्णय क्र.७२** **तहकुब.** **(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.४२** सन २०२४ चे साईलीला अंक (मराठी, हिंदी व इंग्रजी) (द्वै-मासिके) व वितरणासाठी पाकीटे छपाई करून पुरवठा करणेकामी उघडणेत आलेल्या वाणिज्यीक ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत पात्र दरधारकास कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.७३** प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही- प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.४३** इयत्ता ११ वी व १२ वी दोन उर्दु कॉलेज वर्ग चालू करणेबाबत.

**निर्णय क्र.७४** माध्यमिक शिक्षण विभागाकडून माहिती घेऊन प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही-श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.४४** डीजीटी नवी दिल्ली यांचे सुचनान्वये अभ्यासक्रमामध्ये माहे सप्टेंबर २०२२ पासुन झालेल्या बदलानुसार टुल्स ॲण्ड इक्विपमेंट खरेदीबाबत.

**निर्णय क्र.७५** प्रस्ताव मंजूर.सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.

(कार्यवाही-श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था/विधी विभाग )

---

**विषय नं.४५** डीजीटी नवी दिल्ली यांचे सुचनान्वये अभ्यासक्रमामध्ये माहे सप्टेंबर २०२२ पासुन झालेल्या बदलानुसार मशिनरी खरेदीबाबत.

**निर्णय क्र.७६** प्रस्ताव मंजूर.सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.

(कार्यवाही-श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था/विधी विभाग)

---

**विषय नं.४६** सन २०२४ करीता श्री साई प्रसादालयातील डिश वॉशिंग (ताटे धुणे) मशिनकरीता व भांडी धुणेसाठी लिक्विड सोप खरेदी करणेबाबत.

**निर्णय क्र.७७** प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.४७** श्री साई भक्तांच्या प्रसाद भोजन सुविधेसाठी साई प्रसादालयास सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता लागणारा भाजीपाला खरेदी करणेबाबत.

**निर्णय क्र.७८** प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.

(कार्यवाही- श्री साई प्रसादालय/विधी विभाग)

---

**विषय नं.४८** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून जिल्हा परिषद अहमदनगर यांना शाळांच्या नवीन वर्ग खोल्या बांधकामासाठी दुस-या व तिस-या टप्प्यांतील अर्थसहाय्य देणेबाबत.**

**निर्णय क्र.७९** पुर्वीचे रु.१० कोटी रुपयाचे उपयोगीता प्रमाणपत्र मागविण्यात यावे. आता शासन निर्णय दि.२६ जुन,२०१८ नुसार उर्वरीत रु.२० कोटी देण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा. व सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.

**(कार्यवाही-लेखाशाखा विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.४९** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मधील तरतुदीन्वये सल्लागार परिषद गठीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.८०** शासन निर्णय दि.२०.०१.२०१५ मध्ये छाननी समिती सभेबाबत नमुद केल्यानुसार सध्या मा.उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीमार्फत कामकाज होत असल्याने अशी सल्लागार परिषद गठीत करण्याची आवश्यकता नाही.

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१** **जुना पिंपळवाडी रोडवरील पॉलीकार्बोनेट शिट शेड काढून साईबाबा भक्तनिवासस्थान पार्किंगच्या जागेमध्ये पुर्नःउभारणी करणेस तसेच याकामी ई निविदा बोलविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८१** वेळेअभावी चर्चा होऊ शकली नाही.

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२** **सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात अधिनियम २००४ मधील कलम २२(२) च्या तरतुदीतील, व्यवस्थापन निधीच्या मर्यादेपेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता मिळणेकामी शासनास प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.८२** प्रस्ताव मंजूर. **(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३ संस्थानला आयकर विभागाच्या साधारणतः रु.२४१ कोटी करभरणा नोटीस संदर्भात आयकर अपील न्यायाधिकरणाच्या (Income Tax Appellate Tribunal) करमाफी आदेशाची नोंद घेणेबाबत.

निर्णय क्र.८३ अ.नं.१ ते ७ यांनी श्री साईबाबांचे प्रती असलेल्या भक्तीभावापोटी विनामोबदला सेवा दिलेली असल्यामुळे तदर्थ समितीचे वतीने त्यांच्या सेवेची दखल घेऊन त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

(कार्यवाही- लेखाशाखा)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.४ दि.०१.१०.२०२३ ते दि.३१.१२.२०२३ या कालावधीत आर्थिक अनुदान मागणीकरीता प्राप्त झालेल्या अर्जावर निर्णय घेणेबाबत.

निर्णय क्र.८४ धोरणाअभावी अर्ज दप्तरी दाखल करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- लेखाशाखा)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.५ संस्थानसाठी अनुकंपा नियुक्ती संदर्भात लागु असलेल्या भरती नियमावलीबाबत.

निर्णय क्र.८५ प्रस्ताव मंजुर. शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.६ मौजे निमगाव-को-हाळे येथील गट नं.१८३ मध्ये उभारलेल्या शैक्षणिक संकुल प्रकल्पातील शालेय इमारतीकरीता बेंचेस व इतर फर्निचर खरेदी करणेसाठी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारक यांना कार्यादेश देणेविषयी निर्णय होणेबाबत.

**निर्णय क्र.८६** **प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निम्नतम दरधारक यांचेशी आयटेम वाईज वाटाघाटी करुन निविदा स्विकारणेस मान्यता देण्यात आली. यापुर्वी एकुण कामासाठी समितीने मंजुर केलेल्या रकमेपेक्षा एकुण तीनही निविदा मिळून होणारा खर्च यापुर्वी मा.उच्च न्यायालयाने मंजुर केलेल्या रकमेपेक्षा अधिक होत असल्याने नव्याने सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाकडून परवानगी घेण्याचे अटीवर मान्यता दिली.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.७** **विद्युत विभागाचे सन २०१७ ते २०२३ कालावधीतील डेडस्टॉक , कंझ्युमेबल साहित्य प्रत्यक्ष पडताळणी अंती लेखापरिक्षण करुन प्रमाणित अहवाल सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.८७** **प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे लेखापरिक्षकांच्या नेमणूकीस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**वरील निर्णय क्र.३२ ते ८७ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर रात्रौ. ८.०० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(तुकाराम हुलवळे)**
**प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सिध्दाराम सालीमठ,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc)समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**